राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचने अंतर्गत (STCCS) प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करणेबाबत..

# महाराष्ट्र शासन

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्र. सीसीआर/०३१३/प्र.क्र.१४४/२-स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ सप्टेंबर , २०१४.

**वाचा :-**

१. शासन निर्णय क्र. सीसीआर १४०६/प्र.क्र.२४७/२-स, दि. १७/५/२००६.

२. शासन निर्णय समक्रमांक दि. ३१/१०/२०१३.

**प्रस्तावना :-**

राज्यात सध्या त्रिस्तरीय अल्पमुदत सहकारी पतसंरचनेअंतर्गत (STCCS) शेतकऱ्यांना राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा स्तरावर ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व गावपातळीवर २१,३८२ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांमार्फत पीक कर्ज पुरवठा करण्यात येतो. या पतसरंचनेमार्फत शेतकऱ्यांना अल्पमुदत, मध्यम मुदत, व दीर्घ मुदत शेती कर्ज पुरवठा करण्यात येतो.

संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांना वार्षिक ४% व्याज दराने व प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांमार्फत शेतकरी सभासदांना वार्षिक सहा टक्के व्याज दराने अल्पमुदत पीक कर्ज पुरवठा करण्यात येतो. या आर्थिक वर्षापूर्वी प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांना पीक कर्ज पुरवठयात व्याजाचा ३% दुरावा मिळत होता. मात्र संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना ६% व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याबाबत निश्चित केलेल्या धोरणामुळे प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांचा व्याजातील दुरावा ३% वरुन २% एवढा कमी झाला आहे. या बाबीचा प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांच्या अर्थक्षमतेवर अनिष्ट परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. वैद्यनाथन पॅकेजअंतर्गत या संस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध झाल्यानंतर देखील शासनाच्या संदर्भ क्र. १ मधील धोरणामुळे काही प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांना त्यांचा व्यवस्थापन खर्च व आस्थापना खर्च भागविण्यात अडचणी येत आहेत. तसेच काही संस्थांच्या तोटयामध्ये वाढ होत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज पुरवठा करण्यात प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांचे योगदान महत्वपूर्ण आहे. सध्या राज्यातील सुमारे ६५% शेतकऱ्यांना प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांमार्फत पीक कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. विशेषत: गावपातळीवरील अल्प भू-धारक शेतकऱ्यांना प्रामुख्याने या संस्थांमार्फत पीक कर्ज पुरवठा करण्यात येतो.

वरीलप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज पुरवठा करण्यासाठी प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांचे महत्व विचारात घेता या संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी शासनामार्फत पीक कर्ज पुरवठयाच्या प्रमाणात अर्थसहाय्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे नुकसान भरुन काढण्यासाठी त्यांना या संस्थांनी प्रत्येक आर्थिक वर्षात केलेल्या पीक कर्ज वाटपाच्या प्रमाणात संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार देण्यात येणाऱ्या व्याज परतावा योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर करण्यात यावे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रु. २५ लाखापर्यंत पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना | - | १.५ % |
| २) | रु. २५ लाख ते ५० लाखापर्यंत पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना | - | १ % |
| ३) | रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना | - | ०.७५ % |
| ४) | रु. १ कोटी पेक्षा जास्त पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना | - | ०.५० % |

तथापि वरीलप्रमाणे प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांना द्यावयाच्या अर्थसहाय्याची कमाल मर्यादा रु. १ लाख प्रती संस्था एवढी राहील.

हे सुधारीत धोरण शेतकऱ्यांना ६% दराने (परिणामकारक दर शून्य टक्के ) पीक कर्ज वाटप करण्याचे शासनाचे धोरण अमंलात असेपर्यंत चालू ठेवण्यात यावे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांमार्फत करण्यात येणाऱ्या पीक कर्ज पुरवठयावर वरीलप्रमाणे अर्थसहाय्य देय राहिल.

वरीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांनी खालील निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहिल :-

१) गटसचिव / सचिव यांची वेतनश्रेणी निश्चित करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मान्यता घेण्यात यावी. सहकार आयुक्त यांनी निश्चित केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा कर्मचाऱ्यांना जास्त वेतन देणाऱ्या संस्था या अर्थसहाय्यास पात्र असणार नाहीत.

२) प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थेचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८१ (१) (क) मधील तरतूदीनुसार विहित कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे. ज्या संस्थेचे लेखापरीक्षण विहित कालावधीत पूर्ण होणार नाही अशा संस्था या अर्थसहाय्यास पात्र असणार नाहीत.

३) वरीलप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची संस्थेच्या वार्षिक साधारण सभेत नोंद घेऊन संस्थेने अर्थसहाय्याचा प्रस्ताव वैधानिक लेखापरीक्षण अहवालातील कर्ज वाटपाच्या तपशीलानुसार सहाय्यक / उपनिबंधक, सहकारी संस्था यांना दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत सादर करावा. ज्या संस्थांची वार्षिक साधारण सभा विहित कालावधीत होणार नाही अशा संस्था या अर्थसहाय्यास पात्र असणार नाहीत.

४) रु. ५० लाखापर्यंत पीक कर्ज वाटप असणाऱ्या संस्थेच्या व्यवस्थापन व आस्थापना खर्चाचे प्रमाण खेळत्या भांडवलाच्या २.५% पेक्षा जास्त नसावे. तसेच रु. ५० लाखापेक्षा जास्त पीक कर्ज वाटप असणाऱ्या संस्थेच्या व्यवस्थापन व आस्थापना खर्चाचे प्रमाण खेळत्या भांडवलाच्या २% पेक्षा जास्त नसावे.

५) ज्या संस्थांमध्ये लेखापरीक्षण अहवालानुसार अफरातफर अथवा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे अशा संस्थांना सदरचे अर्थसहाय्य देय होणार नाही.

६) संस्थेचे पीक कर्जाच्या वसुलीचे प्रमाण किमान ६०% असणे आवश्यक आहे. वसुलीचे प्रमाण यापेक्षा कमी असल्यास अशा संस्था या अर्थसहाय्यास पात्र असणार नाहीत.

<u>अर्थसहाय्याचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती</u> :-

प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थेने वरील निकष विचारात घेऊन त्या त्या वर्षाचा अर्थसहाय्याचा प्रस्ताव दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत संबंधित सहाय्यक / उप निबंधक, सहकारी संस्था यांना सादर करावा. संबंधित सहाय्यक / उप निबंधक, सहकारी संस्था यांनी संस्थेच्या या प्रस्तावाची छाननी करुन असे प्रस्ताव शिफारशीसह संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना एक महिन्यात सादर करावेत. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी निधीच्या उपलब्धतेनुसार असे प्रस्ताव एक महिन्यात मंजूर करावेत. प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांना वरीलप्रमाणे द्यावयाच्या अर्थसहाय्याची रक्कम संबंधित संस्थांच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील बँक खात्यात जमा करण्यात यावी.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या स्तरावरुन मंजूर करण्यात येणाऱ्या किमान १०% संस्थांच्या प्रस्तावांची विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयामार्फत तपासणी करुन शासन निर्णयातील निकषांची पूर्तता होत असल्याबाबत शहानिशा करावी. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी त्याबाबतचा अहवाल सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयास सादर करावा.

वरीलप्रमाणे प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांना द्यावयाच्या अर्थसहाय्याच्या मागणी प्रस्तावाबाबत व विनियोगाबाबत सहकार आयुक्त व निबंधक यांनी सविस्तर मार्गदर्शनपर सूचना निर्गमित कराव्यात.

प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांना द्यावयाच्या अर्थसहाय्याची व्याप्ती मोठी असल्यामुळे ती खर्चाची नवीन बाब ठरत आहे व त्यामुळे विहित पध्दतीचा अवलंब करुन या खर्चास प्रत्यक्ष विधी मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर व तद्नुसार तरतूद झाल्यानंतर निधी वितरीत करण्यात येईल.

वरील प्रयोजनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधित संस्थांना अदा करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी आहरण करुन हा खर्च वेळेत होईल हे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी पहावे. तसेच याबाबतचा प्रगती अहवाल वेळोवेळी सहकार आयुक्त कार्यालयास पाठविण्यात यावा.

सदरहू रक्कम मागणी क्र. व्ही - २ मुख्यलेखाशिर्ष "२४२५ सहकार - १०७, सहकारी पतसंस्थांना सहाय्य (०१) (१०) शेतकऱ्यांना अल्पमुदत पीक कर्ज पुरवठा करण्यासाठी १% व्याज दराने अर्थसहाय्य (२४२५१५०१)" (योजनेत्तर) (दत्तमत्त) ३३ अर्थसहाय्य, या लेखाशिर्षाखालील सन २०१५-१६ या वर्षासाठी उपलब्ध होणा-या तरतूदीमधून खर्च करण्यात यावा.

हा शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ३०/७/२०१४ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४२३(अ) /१४/व्यय-२, दि. ३१.०८.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०९०६१७५०२३९७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajagopal Devara

Digitally signed by Rajagopal Devara
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, cn=Rajagopal Devara
Date: 2014.09.06 17:54:38 +05'30'

(राजगोपाल देवरा)
सचिव (सहकार)

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
४) मा.मुख्य सचिव महाराष्ट्र शासन मंत्रालय , मुंबई ३२.
५) मा.अप्पर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग , मंत्रालय , मुंबई ३२.
६) प्रधान सचिव (पुनर्वसन व मदतकार्य ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) आयुक्त, कृषी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व जिल्हाधिकारी.
११) सह सचिव, भारत सरकार, कृषी मंत्रालय (सहकार विभाग ) कृषी भवन, नवी दिल्ली.
१२) महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय, पुणे.
१३) मुख्य अधिकारी, रिझर्व बँक ऑफ इंडीया, ॲग्रीकल्चरल क्रेडीट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफिस, गारमेंट हाऊस, मुंबई-४०० ०१८.
१४) उप मुख्य अधिकारी, रिझर्व बँक ऑफ इंडिया, ॲग्रीकल्चरल क्रेडीट डिपार्टमेंट, बॉम्बे रिजनल ऑफिस, गारमेंट हाऊस, मुंबई - ४०० ०१८.
१५) सर्व विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था.
१६) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
१७) सर्व कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.
१८) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक.
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०) सर्व कार्यासने, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
२१) निवड नस्ती- २ स.